## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- ३३७८/२०२२

**अपिलार्थी, श्रीम. श्रध्दा विनायक परब,**
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, प्लॉट क्र.२७/२८,
सेंट लॉरेन्स हायस्कूल समोर, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विभागीय सहसचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १९.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०५.०८.२०२२ | -- | २९.०८.२०२२ | १९.१०.२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. २१.११.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *"माहिती अप्राप्त "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १९.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्रीम.ज्योत्स्ना शिंदे-पवार, विभागीय सचिव तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम.हेमलता बच्छाव, वरिठ अधिक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, वाशी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" अनधिकृत महिला तक्रार निवारण समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने सन २०१९ ते सन २०२२ या कालावधीतील*

*१) सर्व थांबविण्यासाठी त्याची बदली दुसऱ्या विभागीय मंडळात करणे असल्याच्या निष्कर्षाप्रत समिती आली असल्याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सिसिटिव्ही कॅमेरा फुटेज कृपया उपलब्ध करुन देण्यात यावी.*

*२) समितीने सदर चौकशीत पूर्णता गोपनीयता पाळली आहे. तरीही या चौकशी दरम्यान व चौकशी पूर्वीही या प्रकरणाची चर्चा कार्यालयात होत असते व कार्यालयीन वातावरण बिघडल्याचे निदर्शनास आल्या असल्याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देण्यात यावे.*

*३) कार्यालय वातावरणात सुधारणा व्हायची असेल व मंडळाची प्रतिमा खालावण्याच्या या दृष्प्रकारास थोपावयाचे असेल तर श्री.ब्रम्हपूरकर दिलीप व श्रीमती श्रध्दा विनायक परब यांची वेगवेगळ्या विभागीय मंडळात बदली होणे समितीला आवश्यक वाटत असल्याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देणेबाबत.*

*४) सविस्तर अहवालानुसार लैंगिक छळ प्रतिबंधक समिती श्री.ब्रम्हपुरकर दिलिप, पर्यवेक्षक लिपिक व श्रीम.श्रध्दा विनायक परब यांची या विभागाबाहेर वेगवेगळ्या विभागीय मंडळात बदली करावी अशी महिला तक्रार निवारण समिती शिफारस करीत असल्याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देणेबाबत.*

*५) सर्व साक्षी पुराव्यानुसार श्री.ब्रम्हपुरकर दिलीप यांनी महिला रोजंदारी ०३ कर्मचारी यांच्याशी गैरवर्तन केल्याचे चिमटे काढणे संबंधित मुलींनी आस्थापना शाखेत तत्कालीन शाखाप्रमुख यांना मौखिकरित्या तक्रार*

*केल्यासंदर्भात याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देणेबाबत.*

६) *या तक्रारीच्या अनुषंगाने श्रीम.श्रध्दा विनायक परब यांनी खाजगी खाखेच्या संपर्क केंद्रावरील झालेल्या किरकोळ वादातून श्री.ब्रम्हपूरकर दिलीप यांचेवर महिलांसोबत लैंगिक छळ केल्याची तक्रार निष्कर्षाप्रत समिती आली असल्यबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पूरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सी.सी.टी.व्ही.फुटेज उपलब्ध करुन देणेबाबत.*

७) *श्रीम.श्रध्दा विनायक परब यांची मुंबई विभागीय मंडळ प्रशासनास वारंवार त्याच त्याच मुद्याच्या अनुषंगाने कार्यालयास वेठीस धरण्यासाठी नाहक पत्र पाठवणे, लैंगिक शोषणासंदर्भात ई-मेल करणे, चौकशी पूर्ण होण्याआधीच समितीतील प्रतिनिधींना घरी फोन करुन धमगावणे या गोष्टी सातत्याने करत असल्यबाबतची लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे उपलब्ध करुन देणेबाबत.*

८) *समितीत प्रतिनिधी कोण नेमायचे याबाबत श्रीम.श्रध्दा विनायक परब आक्षेप घेतलेला असल्याबाबतची प्राप्त लेखी म्हणणे व पुरावा कागदपत्रे व सहकागदपत्रे तसेच सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज उपलब्ध करुन देणेबाबत. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे. त्यांची बदली दुसऱ्या विभागात करणाऱ्या निष्कर्षाप्रती समिती कोणत्या कागदपत्रांच्या आधारे आली. ती माहिती त्यांना देण्यात आलेली नाही. तसेच सी.सी.टी.व्ही फुटेजबाबतची माहिती त्यांना देण्यात आलेली नाही.

यासंदर्भात खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना यासंदर्भात नस्तीमध्ये उपलब्ध असलेले सर्व कागदपत्रे देण्यात आलेली आहेत. त्याचप्रमाणे सी.सी.टी.व्ही फुटेज हे उपलब्ध नसलेबाबत भांडार शाखेने कळविल्याप्रमाणे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांचे हे निवेदन विचारात घेता असे दिसून येते की, संबंधित नस्तीमधील सर्व कागदपत्रे अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहेत. त्यामुळे अधिक कागदपत्रे पुरविण्यासंदर्भात कोणताही आदेश देता येणार नाही. मात्र सी.सी.टी.व्ही.फुटेज का देण्यात आले नाही किंवा का उपलब्ध नाही? याबाबत अधिक खुलासा करणे आवश्यक आहे. सबब पुढील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा सादर करणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांनी सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत. याबाबतचा खुलासा पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१३.०४.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १९ जानेवारी, २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक, भांडार शाखा,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**- यांना प्रत**

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधिक्षक,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, सेक्टर १६ अे, वाशी,
नवी मुंबई ४०० ७०३.**यांचे मार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक ०४.०५.२०२६ ( In Continuation of order dt.१९.०१.२०२६)

### विवेचन

उपरोक्त दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक, शिक्षण मंडळ, मुंबई विभाग यांना सी.सी.टी.व्ही.फुटेज का पुरविले नाहीत किंवा का उपलब्ध नाहीत, याबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०४.०५.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी व प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारी श्री.संजय मनोहर कापसे, वरीष्ठ अधीक्षक, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी आयोगाकडे कोणताही अहवाल सादर केलेला नाही. त्यांच्या अहवालासाठी सदर प्रकरण पुढील दिनांकावर ठेवण्यात येत. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ अधीक्षक, भांडार शाखा, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई, विभागीय मंडळ वाशी यांनी पुढील सुनावणीस उपस्थित राहून आयोगाच्या दि.१९.०१.२०२६ रोजीच्या आदेशाप्रमाणे त्यांचा अहवाल सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०५.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०४ मे, २०२६ .

